## पुणे महानगरपालिका
## जाहीर प्रकटन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४५८ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत **''सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी – २०१४''** तयार करण्यात आलेली असून सदर उपविधीस कलम ४५९ अन्वये मा. मुख्य सभा ठरावाने मान्यता प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम चे कलम ४६० अन्वये या उपविधींबाबत नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात येणार आहेत. याकरीता सदर उपविधी १५ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये/क्षेत्रिय कार्यालये, ४ उपायुक्त कार्यालये व घनकचरा व्यवस्थापन कार्यालय याठिकाणी विनामुल्य पाहणीसाठी उपलब्ध आहेत. सदर जाहीर प्रकटनानंतर ४५ दिवसांची मुदत हरकती व सूचना मागविणेकरीता देण्यात आलेली आहे. नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना संबंधित क्षेत्रिय कार्यालय/महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय/उपायुक्त कार्यालय/नकचरा व्यवस्थापन कार्यालय याठिकाणी लिखीत स्वरूपात दयाव्यात जेणेकरून सदर हरकती व सूचनांचा समावेश करून सुधारित **''सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य उपविधी – २०१४''** तयार करून सदर उपविधीस पुनःश्च मा. मुख्य सभेची मान्यता घेवून तद्नंतर ही उपविधी मा. शासनाच्या मान्यतेस पाठविण्यात येणार आहे.

सदर प्रकटनानुसार सर्व मा. सभासद, मा. अधिकारी, पत्रकार, स्वयंसेवी संस्था व नागरिक आपल्या हरकती व सूचना सदर उपविधीच्या प्रकटनानंतर ४५ दिवसांच्या आत संबंधित क्षेत्रिय कार्यालय/महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय/ उपायुक्त कार्यालय/ घनकचरा व्यवस्थापन कार्यालय याठिकाणी लिखीत स्वरूपात दयाव्यात.

**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**